रयत शिक्षण संस्थेचे,
श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर पुरस्कृत
'शारीरिक शिक्षण योजना व्यवस्थापन'
दोन दिवशीय राज्यस्तरीय कार्यशाळा
दि. १० व ११ जानेवारी, २०२०

## अहवाल

रयत शिक्षण संस्थेच्या श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळमध्ये 'शारीरिक शिक्षण योजना व्यवस्थापन' या विषयावर शिवाजी विद्यापीठ पुरस्कृत दि. १० व ११ जानेवारी २०२० दोन दिवशीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मंजुश्री बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेचे उद्घाटन सातारा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मा. उदय कबुले यांच्या हस्ते झाले. कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चव्हाण यांनी प्रास्ताविक करून कार्यशाळा आयोजनाची भूमिका स्पष्ट केली. कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना सातारा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. उदय कबुले म्हणाले की, 'विद्यार्थ्यांनी स्वत:ची अशी उत्कृष्ठ शरीर संपदा प्राप्त केली पाहिजे, त्यासाठी त्यांनी मोबाईल आणि संगणकावर खेळल्या जाणाऱ्या 'आभासी गेम' मधून बाहेर पडून वास्तवातील मैदानावर जाऊन घाम गाळण्याची तयारी ठेवली पाहिजे, तरच भविष्यातील आपल्या देशाचे उतमोत्तम खेळाडू घडतील.' यावेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मंजुश्री बोबडे होत्या. त्यांनी सुरुवातीला महाविद्यालयाला ही कार्यशाळा आयोजीत करण्याची संधी दिल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाला धन्यवाद दिले व उपस्थित मान्यवर आणि सहभागी शारीरिक शिक्षक संचालकांचे स्वागत केले. या दोन दिवशीय कार्यशाळेची सुरुवात डॉ. दीपक शेंडकर (पुणे) यांच्या बिजभाषणाने झाली. त्यामध्ये त्यांनी 'शारीरिक शिक्षण योजनेच्या'' अंमलबजावणीतील त्रुटी आणि एकूणच सर्वच पातळीवरील उदासीनतेवर भर दिला. त्यानंतर झालेल्या प्रथम सत्रात प्राचार्य डॉ. महेश देशपांडे यांनी 'शारीरिक शिक्षण योजना व्यवस्थापन' याची सुदृढ आणि बलशाली भारतासाठी गरज व्यक्त केली. दुसऱ्या सत्रात श्रीमान भाऊसाहेब झाडबुके कॉलेज बार्शीचे डॉ. जगदीश झाडबुके यांनी 'शारीरिक शिक्षण' ह्या विषयाकडे बघण्याच्या समाजाच्या दृष्टिकोनावर नाराजी व्यक्त करून शालेय स्तरापासूनच 'खेळ' हा विषय बाजूला टाकला जातो. खेळाच्या तासला गणित किंवा इंग्रजी अशा विषयांचे तास घेतेले जातात, त्यामुळे खेळाकडे दुर्लक्ष होत जाते'.

दि. ११ जानेवारी रोजीच्या प्रथम सत्रात डॉ. सुनील चव्हाण (कुरुंदवाड) यांनी 'शारीरिक शिक्षण योजनेचे योग्य व्यवस्थापन कशाप्रकारे केले जावू शकते याचे प्रात्यक्षिक सादर केले. दुसऱ्या सत्रात शिवाजी विद्यापीठ शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब उलपे यांनी तर शेवटच्या सत्रात डॉ. इब्राहीम मुल्ला (हुपरी) यांनी 'शारीरिक शिक्षण योजना व्यवस्थापन' या विषयावर सहभागी शारीरिक शिक्षक संचालकांना मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. पंकज ढमाळ यांनी कार्यशाळेचे समन्वयक तर प्रा. राजेंद्र तांबिले यांनी सहसमन्वयक म्हणून काम पाहिले. प्रा. डॉ. सुभाष आहेर यांनी सूत्रसंचालन केले.

Principal
Shripatrao Kadam Mahavidyalaya, Shirwal
Tal. Khandala, Dist. Satara

Scanned with CamScanner